




# एमजीएम संवाद

वर्धापन दिन विशेष

औरंगाबाद | शुक्रवार, 20 डिसेंबर 2019


**गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रसिद्ध महात्मा गांधी मिशन ही संस्था देदिप्यमान कारकिर्दीची 37 वर्षे पूर्ण करत आहे. शिक्षण, सेवा आणि संशोधनाचे व्रत हाती घेत सुरू असलेली ही वाटचाल आता आणखी एका नव्या वळणावर येऊन पोहोचली आहे. नुकतीच महाराष्ट्र शासनाने 'एमजीएम विद्यापीठ'ला मान्यता दिली आहे. एमजीएम हे मराठवाड्यातील पहिले स्वयंअर्थसाह्यीत खासगी विद्यापीठ आहे. मराठवाड्यासह देशविदेशातील विद्यार्थ्यांना सर्व सोईसुविधांनी परिपूर्ण शिक्षण मिळावे, हाच या विद्यापीठाचा उद्देश आहे.**

# एमजीएमची नई तालिम

शिक्षण, सेवा आणि संशोधन या त्रिमितीकांवर मागील ३७ वर्षांपासून अविरत कार्यरत असलेले एमजीएम आता मराठवाड्यातील पहिले खासगी विद्यापीठ बनले आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात अत्यंत भरीव आणि दर्जेदार कामगिरी करण्याची या संस्थेची दिशा तर तीन दशकांपूर्वीच निश्चित झाली होती. मात्र, आता विद्यापीठाच्या रूपाने ही संस्था एक नवी झेप घेण्याकडे सरसावली आहे. ३७ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी या संस्थेने शिक्षण आणि सेवेच्या अत्यंत पवित्र क्षेत्रात पहिले पाऊल ठेवले. त्या पावलाने पुढे शिस्त, संशोधन, निसर्गरक्षण, कलाजोपसना, वैविध्यता, गुणवत्ता असे अनेक पल्ले गाठत यशोशिखर गाठले. पण, म्हणतात ना की, यशाचे गमक शिखरावर नसावे तर त्याने आसमंत झळाळून निघायला हवे आणि नेमकी हीच वाटचाल सध्याच्या घडीला एमजीएम करत आहे.



श्री. कमलकिशोर कदम, श्री. अंकुशराव कदम यांच्यासह अन्य काही होतकरू आणि विलक्षण दुरदृष्टी असणाऱ्या व्यक्तींनी मिळून २० डिसेंबर १९८२ रोजी 'महात्मा गांधी मिशन' या संस्थेचा शुभारंभ केला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे केवळ नाव देणे हेच त्यांच्या संकल्पनेमागील उद्देश नव्हते तर बापूंच्या जीवनसूत्रीचा, मूल्यांचा आणि ध्येयांचा संस्थेच्या प्रत्येक कार्यातून अवलंब करणे, हा अत्यंत निर्मळ हेतूही त्यामागे होता आणि तो आजतागायत अत्यंत प्रामाणिकपणाने तसेच निष्ठेने जपण्याचा प्रयत्नही संस्थेच्या प्रत्येक घटकांकडून होत आहे. एमजीएमच्या प्रत्येक परिसरात, अध्ययन-अध्यापन तसेच प्रत्येक घडामोडींत महात्मा गांधी प्रकर्षाने दिसतात. नांदेड ते नोएडापर्यंतचा एमजीएम संस्थेचा प्रवासही तितकाच थक्क करणारा आहे. नांदेड, औरंगाबाद, परभणी, मुंबई आणि नोएडा या शहरांमधील शेकडो एकर जमीनीवर एमजीएम संस्थेच्या विविध शाखा दिमाखात उभ्या आहेत. या दिमाखात देखावा नाही तर गुणवत्ता आणि संस्कार आहेत. अत्यंत शिस्तबद्ध, अद्ययावत तसेच समर्पक शिक्षण देणारे 'जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय' हे या संस्थेचे पहिले अपत्य. देशभरातील हजारो अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या तुलनेत सर्वोत्तम अभियंता निर्माण करण्याची या महाविद्यालयाची परंपरा स्थापनेपासून आजवर सर्वोत्तमच आहे. केवळ देशातीलच नव्हे तर जागतिक स्तरावरील अनेक कंपन्या, संस्था, संघटना आदींमध्ये 'जेएनइसी'च्या विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमटवला आहे. अत्याधुनिक सोईसुविधांनी सुसज्ज, तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपचारपद्धती आणि तळागाळातील सर्वच रुग्णांचे अत्यंत कमी शुल्कात उपचार करणारे वैद्यकीय महाविद्यालय एमजीएमच्या सेवाव्रतीपणाचा उत्तम नमुना आहे.

भारतीय कला आणि संस्कृतीचे दर्शन घडवणारा "महागामी' हा विभाग एमजीएमचे एक वेगळेच विश्व आहे. कथ्थक आणि ओडीशी या नृत्यशैलींच्या प्रशिक्षणासाठी जगभरातील नामांकित संस्थांमध्ये महागामीचा उल्लेख होतो. शिवाय, तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात अग्रेसर असलेले पॉलिटेक्निक, कृषी क्षेत्राला आधुनिकतेची जोड देऊन युवकांना उदयोन्मुख बनवणारे नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय, व्यवस्थापनशास्त्र विभाग, हॉटेल मॅनेजमेंट, पत्रकारिता, पॉलिटेक्निक, फाइन आर्ट, फॅशन डिझायनिंग आणि खादी नर्सिंग, संगणकशास्त्र, बायोसायन्स, नॅचरोपॅथी आणि योगा, व्यवसायिक शिक्षण, विदेशी भाषा, फिजिओथेरेपी, फुड टेक्नालॉजी अशा विविध अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमुळे एमजीएमचा सर्वव्यापी दृष्टीकोन दिसून येतो. तर, फर्स्ट स्टेप स्कूल, क्लोव्हर डेल, संस्कार विद्यालयांमधून अगदी बालवयापासून सशक्त पीढी घडवण्याची चाहूलही लागते. विज्ञान केंद्र, आरोग्यम, ऑटीझम आणि स्पोर्ट्स क्लब ही केंद्रे विद्यार्थ्यांच्या विज्ञानवादी, आरोग्यदायी आणि शारीरिक विकासाविषयीची जागरुकता सिद्ध करतात. शिक्षणाचे महत्व आयुष्यात आहेच. परंतु, शिक्षणासोबत कल्पकतेची, संशोधनाची, सेवेची, सृजनशिलतेची, स्वयंशिस्तीची, निसर्गप्रेमाची तसेच राष्ट्रप्रेम, वचनबद्धता आणि सामाजिक बांधिलकीही जपली जावी, या उद्देशाने एमजीएम कार्य करत आहे.

'सेवा, शिक्षण आणि संशोधन' हे तर एमजीएमचे ब्रीदच आहे. मागील ३७ वर्षांमध्ये या ब्रीदावर ही संस्था सातत्याने काम करत आहे. महात्मा गांधींनी स्वयंपूर्ण शिक्षण विचार विकसित करण्याच्या उद्देशाने "नई तालिम' ही संकल्पना अस्तित्वात आणली. काळाच्या प्रवाहानुसार शैक्षणिक विचारांमध्ये स्वावलंबन, आत्मसन्मान आणि श्रमप्रतिष्ठा या मुल्यांचा अंतर्भाव त्यात असणे, हे बापूंना अपेक्षित होते. एमजीएमने बापूंचा हा अपेक्षाभाव कृतीतून सत्यात उतरवला आहे. आज ही संस्था वयाची केवळ ३७ वर्षेच पूर्ण करत नाहीये. तर, हा सोहळा आहे मागील ३७ वर्षांत घडवलेल्या अनेक पिढ्यांच्या वाटचालीचा. हा सोहळा आहे या पिढ्यांनी राष्ट्राच्या उभारणीत दिलेल्या योगदानाचा आणि सोहळा आहे नव्या आरंभाचा. हा नवा आरंभ म्हणजेच "एमजीएम विद्यापीठ'. आज हे विद्यापीठ देशाच्या सेवेत रुजू होत आहे. मराठवाड्यातील पहिले स्वयंअर्थसाहाय्यित खासगी विद्यापीठ हे बिरुद घेऊन एमजीएम विद्यापीठ कार्यान्वित झाले आहे. मात्र, देश आणि जगातील अव्वल दर्जाच्या विद्यापीठांमध्ये गणना व्हावी, हे प्रामाणिक स्वप्न यामागे आहे. भविष्यातील या सोनेरी प्रवासाला खूप खूप शुभेच्छा...

**प्रा. विवेक एम. राठोड**
(एमजीएम वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद महाविद्यालय, औरंगाबाद)

---

## दिशादर्शक बोधचिन्ह, स्वयंदीप होण्याचा संदेश

॥ अप्पो दीपो भव ॥
महात्मा गांधी मिशन विश्वविद्यालय
MGMUNIVERSITY

एमजीएम विद्यापीठाच्या बोधचिन्हामध्ये महात्मा गांधींची काठी हाती घेऊन पुढे चालणारा मुलगा, त्यामागे गांधीजींचा चरखा आणि त्याखाली 'अप्पो दीपो भव' हे बोधवाक्य कोरलेले आहे. गांधीजींच्या जीवनमुल्यांचा, शिकवणींचा आणि विचारांचा अवलंब करत अविरत वाटचाल करत राहावी आणि स्वयंदीप व्हावे, असा संदेश यातून प्रतित होतो. 'अप्पो दीपो भवः' हा तथागत गौतम बुद्धांनी दिलेला पाली भाषेतील सुविचार आहे. याचा मराठीमध्ये 'स्वयंदीप व्हा', असा अर्थ होतो. म्हणजेच स्वतःचे जग स्वतः तयार करुन त्या मार्गावर वाटचाल करावी आणि आपले आयुष्य समृद्ध तर करावे. यातून बोध घेत एमजीएम विद्यापीठातील विद्यार्थ्यांनीही प्रगती साधावी, असा संदेश या ब्रीदवाक्यातून दिलेला आहे. तर, गती आणि प्रगतीचे प्रतिक असलेल्या चरख्याप्रमाणे आपण आयुष्यात सद्विचार, सदाचार आणि श्रमसाधना करत गतिमान होत राहावे. नव्या वाटा शोधाव्या, प्रगती साधावी, हा संदेश यातून प्रतित होतो. गांधीजींच्या हातातील काठी पकडत समोर जाणारा मुलाचे या बोधचिन्हातील चित्र मौलिक विचार प्रकट करते. बापूंच्या जीवनमुल्यांचा, तत्वांचा एमजीएमच्या प्रत्येक वाटचालीत प्रतिबिंब झळकते. त्यांच्या याच तत्वांवर प्रत्येकांनी ही वाटचाल करावी, असा यात बोध आहे.

---

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा. शरदचंद्र पवार यांची प्रमुख उपस्थिती**

## महात्मा गांधी मिशनचा आज वर्धापन दिन, एमजीएम विद्यापीठाचा शुभारंभ

**औरंगाबाद** | शिक्षण, सेवा आणि संशोधनाचे व्रत हाती घेऊन कार्यरत असलेल्या महात्मा गांधी मिशनने ३७ वर्षे पूर्ण केली आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी घडवण्यात संस्थेचे नाव अग्रणीवर आहे. याच धर्तीवर शिक्षण प्रवाहात संस्थेने आता पुढचे पाऊल टाकले आहे. ते म्हणजे नुकतेच शासनाने संस्थेला खासगी विद्यापीठाचा दर्जा बहाल केला आहे. याच निमित्ताने संस्थेचा वर्धापन दिन तसेच विद्यापीठाचा शुभारंभ सोहळा २० डिसेंबर २०१९ (शुक्रवार) रोजी आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभा खासदार शरदचंद्र पवार, माजी विधानसभा अध्यक्ष आ. दिलीपराव वळसे पाटील या सोहळ्याचे प्रमुख अतिथी असतील. तर संस्थेचे अध्यक्ष आणि माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम, कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे , विश्वस्थ प्रतापराव बोराडे यांच्यासह अनेक मान्यवरांची या सोहळ्याला उपस्थिती राहील.

२० डिसेंबर २०१९ रोजी सायंकाळी ५.३० वाजता एमजीएम स्टेडियमवर वर्धापन दिन सोहळा आणि नव्या विद्यापीठाच्या शुभारंभाचा मुख्य सोहळा पार पडेल. एमजीएम संस्थेचा वर्धापन दिन सोहळा हा सर्वांसाठीच नेहमीच आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो. या पार्श्वभूमीवर दरवर्षी हेरिटेज रन ही मॅराथॉन स्पर्धा तसेच एमजीएम ऑलिम्पिक या विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेत महात्मा गांधी मिशनच्या औरंगाबाद, नांदेड परभणी, मुंबई आणि नोएडा येथील विद्यार्थी संघ सहभागी होत असतात. दरम्यान, २० डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांकडून सादर केले जाणारे रंगारंग आणि बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम उपस्थितांच्या डोळ्याचे पारणे फेडतात. यंदाच्या वर्धापन दिनाच्या मुहूर्तावरच एमजीएम विद्यापीठाचा शुभारंभ केला जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि राज्यसभा खासदार शरदचंद्रजी पवार यांची या समारोहाला विशेष उपस्थिती लाभणार आहे. एमजीएमचे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना एकत्रित घेऊन बनवलेल्या "मिले सूर मेरा तुम्हारा' या गीतावर आधारित चित्रफित तसेच विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरणही या वेळी करण्यात येईल.

### दिमाखदार सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



▪ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार हे यंदाच्या सोहळ्याचे आकर्षण असणार आहेत. सोबतच माजी विधानसभाध्यक्ष दिलीपराव वळसे पाटीलही उपस्थित असतील.

**कार्यक्रमातील ठळक बाबी**

- एमजीएम विद्यापीठाचा मा. शरदचंद्रजी पवार यांच्या शुभहस्ते शुभारंभ
- एमजीएमचे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना घेऊन बनवलेल्या 'मिले सुर मेरा तुम्हारा' या गीतावर आधारित चित्रफितीचे सादरीकरण.
- गवाक्ष, विस्टा, एमजीएम संवाद या विशेषांकांचे प्रकाशन.
- एमजीएमच्या विविध विभागांतील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण.

---

## इन्नोवेशन, इन्क्यूबेशन अँड रिसर्च सेंटरचेही उद्घाटन

आविष्कारशीलता हे कोणत्याही शाखेचे महत्त्वपूर्ण तत्व आहे. अशाच अविष्कारशील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी अद्ययावत असे इन्नोवेशन, इन्क्यूबेशन अँड रिसर्च सेंटरचेही मा. शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

**स्थापना वर्ष :2019**

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या विस्तारित वटवृक्षाखालीच इन्नोवेशन, इन्क्यूबेशन अँड रिसर्च सेंटर सुरू होणार आहे. २० डिसेंबर म्हणजे संस्थेच्या वर्धापन दिनीच या केंद्राचे मा. शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे.

जेएनईसी महाविद्यालयाच्या अंतर्गत तांत्रिक प्रशिक्षणाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे. परिपूर्ण अभियंता तयार करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्याची सांगड घालणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्षात त्याचा कसा उपयोग करता येईल याचे प्रशिक्षण देण्यासाठी हे केंद्र विद्यार्थ्यांना उपयोगी पडणार आहे. सेंटर ऑफ ऑटोमेशन टेक्नॉलॉजी क्षेत्रात कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यार्थी आणि ऑटोमेशन इंडस्ट्रीला मार्गदर्शन करण्याचा केंद्राचा मुख्य हेतू आहे.

70-80% कंपन्या ऑटोमोटीव्ह घटकांची निर्मिती करत आहेत. ऑटोमेशन व रोबोटिक्स हा त्याचा कणा आहे. यामुळेच या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी अभियंत्यांना पुरक अशा प्रोग्रामिंग, ट्रबलशुटींग यांचे ज्ञान आवश्यक आहे. या केंद्रात मेकाट्रॉनिक्स लॅब, रोबोटिक्स लॅब, ऑटोमेशन लॅब, कॅड/कॅम, सीएमसी ट्रैनिंग, न्यूमॅटिक्स, हैड्रॉलिक्स अँड इलेक्ट्रो न्यूमॅटिक्स लॅब तसेच अद्ययावत मशिन्स उपलब्ध आहेत. तसेच जर्मनीतून प्रशिक्षण घेऊन आलेले मार्गदर्शक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

शैक्षणिक संस्था आणि कंपनी यांच्यातील दुवा म्हणून हे सेंटर काम करणार आहे. विद्यार्थ्यांना परिपूर्ण अभियंता होण्यासाठी आवश्यक असे सर्व अद्ययावत प्रशिक्षण कि‍ट्स उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना विविध नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

**-स्वाती खरात** (एमएएमसीजे)

---

**एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे यांची भूमिका**

# आपल्याला काय शिकायचे हे विद्यार्थी स्वत:च ठरवतील

महात्मा गांधी मिशन ही सेवा, शिक्षण आणि संशोधनाचे ध्येय घेऊन काम करणारी संस्था आता मराठवाड्यातील पहिले स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठ बनले आहे. या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू बनण्याचा बहुमान डॉ. सुधीर गव्हाणे यांना मिळाला आहे.

**एमजीएम विद्यापीठाच्या लोकार्पणाच्या निमित्ताने डॉ. सुधीर गव्हाणे यांच्याशी एमजीएम वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाचे विद्यार्थी महेंद्र भंडारे, विशाल जाधव आणि अश्लेष खडसे यांनी साधलेला संवाद....**

▪ **प्रश्न : महात्मा गांधी मिशन संस्था ते विद्यापीठ ही वाटचाल नेमकी कशी आहे ?**

**डॉ. गव्हाणे :** जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रुपात मराठवाड्यात अभियांत्रिकी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवल्या गेली. येथील हजारो विद्यार्थी सध्या देशविदेशात उच्च पदांवर कार्यरत आहेत. अनेक नामांकित उद्योजक बनले, हे एमजीएम संस्थेचे यश आहे. त्यासह महागामी, फाईन आर्ट्स, खादी आणि पैठणी, फिल्म आर्ट्स, बिदरी कला यांसह अन्य कलाभ्यासांवर आधारित विभाग अत्यंत उत्तम कामगिरी करत आहेत. महात्मा गांधी यांच्या विचारांवर ही संस्था काम करत असून नफा - तोट्याच्या आर्थिक गणिताला इथे जास्त वाव नसतो. या संस्थेने नैसर्गिकता जपणारे एखादे विद्यापीठ स्थापन करावे याच उद्देशाने यंदा महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्ताने तशी योजना ठरली आणि ०९ सप्टेंबर २०१९ पासून ते कार्यरतही झाले आहे. हे मराठवाड्यातील पहिले स्वयंअर्थसाहाय्यित खासगी विद्यापीठ आहे.

**प्रश्न- नव्या विद्यापीठात आपल्या कोणत्या शैक्षणिक योजना असतील?**



**डॉ. गव्हाणे :** ५० टक्के प्रात्यक्षिक आणि ५० टक्के लेखी या 'फॉर्म्युल्यानुसार' आम्ही अभ्यासक्रम तयार करणार आहोत. 'आऊटकम बेस' या स्वरूपाचे धोरण आम्ही राबवणार आहोत. उदा. पत्रकारितेच्या विध्यार्थ्याला बातमी लिहिता येत असेल तरच त्याला पदवी देण्यात येईल. किमान कौशल्य तरी विध्यार्थ्यांना यायलाच हवेत. सोबतच 'चॉईस बेस' अभ्यासक्रमही राबवण्यात येतील. उदा. अभियांत्रिकीच्या विध्यार्थ्याला फोटोग्राफी शिकण्याची आवड असेल तर तो तेही शिकू शकेल आणि फाईन आर्टच्या विध्यार्थ्याला आपला अभ्यासक्रम शिकताना त्याला आवडणाऱ्या पत्रकारितेचाही अभ्यासक्रम शिकता येईल. म्हणजे त्यांना कुठल्याही प्रकारच्या बंधनात अडकवणाऱ्या शिक्षणाऐवजी आपापले छंद जोपासणारे शिक्षणाचे मार्ग आम्ही देणार आहोत. त्यांना काय शिकायचं ते स्वतः ठरवतील.

▪ **प्रश्न : सामाजिक आणि आर्थिक मागास घटकातील विध्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीच्या योजना आहेत का ?**

**डॉ. गव्हाणे :** डॉ. गव्हाणे : सरकारी नियमानुसार खासगी विद्यापीठांत शिष्यवृत्ती दिली जात नाही. पण राखीव जागा बंधनकारक असतात. हे विद्यापीठ स्वयंसाह्यीत असल्याने विद्यापीठाकडून शिष्यवृत्ती देणेही शक्य नाही. याबाबत सखोल विचार करून मागास घटकांतील मेरिटच्या विध्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याचे विचाराधीन आहे. यासाठी विविध महाविद्यालयांतील माजी विध्यार्थी मदतीसाठी पुढे आले आहेत. एकार्थी त्यांना विद्यार्थ्यांचे शिक्षणासाठी पालकत्व स्वीकारण्यास सांगणार आहोत. ३०० विध्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याचे आमचे उद्दिष्ट असणार आहे. पैशाअभावी एकही विध्यार्थी शिक्षणापासून दूर राहता कामा नये, असा आमचा प्रयत्न असेल.

▪ **प्रश्न : ब्रीद वाक्य व बोधचिन्हामागील संकल्पना काय?**

**डॉ. गव्हाणे :** विद्यार्थ्यांनी स्वयं प्रकाशित व्हावे. स्वतःचा मार्ग स्वतः शोधून स्वतःसह जगालाही बदलावे, असा याचा अर्थ. आम्ही मुलांना विध्यार्थीच नव्हे तर 'लर्नर' बनवणार आहोत. उदा. मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांनी भंगारातील वस्तूंपासून सायकलवर चालणारी 'वॉशिंग मशिन' बनविली. यामुळे वीज, वेळ व श्रमाची बचत होणार आहे. अशाप्रकारचे समाजोपयोगी उपक्रम विध्यार्थ्यांकरवी राबवण्याचीही योजना आहे. २० डिसेंबर या वर्धापन दिनानिमित्ताने आयआयटी मुंबईने बनवलेले सौर उर्जेवरील टेबल लॅम्प विद्यापीठातर्फे परिसरातीलच गांधेली गावालगतच्या तांड्यांवरील ३०० कुटुंबांना वाटण्यात येणार आहे. यामुळे खऱ्या अर्थाने आम्ही 'उजाला' करणार आहोत.

**प्रश्न : आगामी काळात विद्यापीठाचे 'व्हिजन' काय असणार आहे?**

**डॉ. गव्हाणे:** आम्हाला नोकरी मिळवणाऱ्यांसोबतच नोकरी देणारेही विध्यार्थी घडवायचे आहेत. त्याने आपल्या कौशल्याच्या बळावर ताठ मानेने ती मिळवायला हवी. यासाठी आत्ताच्या रूढ अभ्यासक्रमात बदल करणे अपेक्षित आहे. भविष्यात हे विद्यापीठ विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवणारे विद्यापीठ बनेल, हेच आमचे ध्येय असणार आहे. देशातील बहुतांश यशस्वी विद्यापीठे लहान शहरातच आहेत. आपल्या औरंगाबादनेही त्यादिशेने वाटचाल सुरु केली आहे. हेतू स्पष्ट आणि सरळ आहे. त्यामुळे येत्या काळात आपण निश्चितच योग्य ठिकाणी पोहोचलेले असू.

# चौथ्या स्तंभकारांना आकार देणारे

# एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय

'पत्रकार' हा समाजाचा आरसा असतो आणि तो असायलाच हवा. प्रत्येक पत्रकाराला आपला इतिहास, वर्तमानकाळातील सामाजिक तसेच राजकीय घडामोडी आणि येणाऱ्या भविष्यकाळातील काही अंदाजात्मक गोष्टींची जाण असायला हवी. पत्रकार म्हणजे असा व्यक्ती, ज्याला समाजातील प्रश्न अभ्यासूपणे मांडता यायला हवे, तसेच अनेक विषयांवर त्याला भाष्य करता यायला हवे. यासाठी पत्रकाराला ज्या विषयावर बोलायचे किंवा लिहायचे आहे, त्याबाबतीत सखोल माहिती हवी. **म्हणजेच काय तर पत्रकार हा व्यासंगी असावा, विचारी असावी, विवेकी असावा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे निर्भीड असावा. भविष्यातील अशाच निडर आणि अभ्यासू पत्रकारांना घडवण्याचे काम करतेय, महात्मा गांधी मिशनचे वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय. 1993 मध्ये एमजीएम वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.**

## स्थापना वर्ष - १९९३

स्थापना झाल्यापासून ते आजपर्यंत महाविद्यालयाने हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला उभारणी देण्याचे काम केले आहे. महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांमधील विविध कलागुण ओळखून, प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या आवडत्या क्षेत्रात काम करण्याची संधी दिली जाते. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, भौगोलिक, पर्यावरण अशा अनेक महत्वाच्या विषयांची माहिती असणे, गरजेचे असते. यासाठी महाविद्यालयातर्फे प्रत्येक क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. यामुळे विद्यार्थ्यांना अनेक विषयांची माहिती मिळते, त्यांना काम करताना या बाबींचा उपयोग होतो. प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडियामधील विविध वैशिष्ट्ये, काम करताना येणाऱ्या अडचणी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

पत्रकार हा समाजातील अत्यंत जबाबदार घटक आहे. समाजाला योग्य दिशेने नेण्याचे काम तो करतो. अशावेळी पत्रकाराने सतर्क व संवेदनशील असणे गरजेचे असते. यासाठी विविध विषयांवरील कार्यशाळेचे आयोजन केले जाते. जेणेकरून विषयाची गांभीर्यता आणि महत्व विद्यार्थ्यांच्या लक्षात येते. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक मिडियानंतर, डिजिटल मिडियाचे महत्व महाविद्यालयाने लक्षात घेतले आहे. यासाठी ब्लॉगिंग, वेबपोर्टल, मोबाईल जर्निलिझम आदी माध्यम क्षेत्रातील नवीन प्रवाहांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. पत्रकारितेत 'थेअरी' पेक्षा प्रॅक्टिकलला अधिक महत्व असते. यासाठी विविध औचित्यांवर विद्यार्थ्यांकडून एमजीएम संवाद या विशेषकांचे प्रकाशन करण्यात येते, तसेच व्हिडिओ बुलेटीन तयार करण्यात येते. यामुळे विद्यार्थ्यांना पेजडिझाइन, संपादन आणि सर्वात महत्वाचे म्हणजे 'डेडलाईन' याविषयी माहिती होते. विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केल्यानंतर, त्यांना नोकरी मिळावी यासाठी, विद्यार्थ्यांमधील विविध गुणांना विकसित करण्यात येते. यामुळे महाविद्यालयातून पदवी घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी परिपूर्णच असतो.

- **प्रीतेश सूर्यवंशी,** एमएएमसीजे



## विविध माध्यमांत 'सीजेएमसी'चे विद्यार्थी

**एमजीएम पत्रकारिता महाविद्यालयात शिकून बाहेर पडलेले हजारो विद्यार्थी सध्या देशविदेशातील टाईम्स, इंडियन एक्सप्रेस, द हिंदू, भास्कर, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, एबीपी अशा असंख्य मुद्रित, इलेक्ट्रॉनिक तसेच नवमाध्यमांमध्ये कार्यरत आहेत. तसेच अनेक विद्यार्थी जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत असून अनेकांनी स्वतंत्र माध्यम व्यवसाय सुरू केला आहे**

## एमजीएम कम्युनिटी रेडिओ



**दोन वर्षांपूर्वी एमजीएमने एकमेव कम्युनिटी रेडिओ सुरू केले. अल्पावधीतच हे रेडिओ लोकप्रिय झाले असून त्यावर विविध माहिती, मनोरंजन आणि शिक्षणविषयक कार्यक्रम सादर केले जातात.**

## 'मीडिया'ला आवश्यक सर्व सुविधा

**एमजीएम वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद महाविद्यालयामध्ये माध्यम क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. त्यामध्ये अत्याधुनिक दर्जाचे स्टुडिओ, कॅमेरे तसेच अन्य एडिटींग उपकरणे, स्वतंत्र रेडिओ केंद्र, वर्तमानपत्र बनवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा, चर्चासत्रांसाठी स्वतंत्र हॉल तसेच अद्ययावत वर्ग आणि संगणकव्यवस्था या ठिकाणी उपलब्ध आहेत.**

## दिग्गजांच्या मार्गदर्शनात घडतात पत्रकार

**विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा आणि एक सजग, संवेदनशील आणि जाणकार पत्रकार घडावा, या हेतूने महाविद्यालयात सातत्याने तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाचे, कार्यशाळांचे तसेच चर्चासत्रांचे आयोजन केले जाते. कृषी आणि ग्रामीण पत्रकारितेच्या क्षेत्रात भरीव योगदान देणारे तसेच रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त पत्रकार पी.साईनाथ, पद्मश्री आणि राज्यसभेचे खासदार तसेच ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, पद्मश्री राजदीप सरदेसाई, ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखेडे, राजकीय विश्लेषक हेमंत देसाई, माध्यमतज्ज्ञ तसेच ज्येष्ठ राजकीय विश्लेषक जयदेव डोळे, लेखक आणि संपादक संजय आवटे, पत्रकार अमेय तिरोडकर आदी वक्त्यांनी मागील वर्षभरात पत्रकारिता विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**

# एमजीएम फिल्म अँड आर्ट्स

# एकाच छताखाली फिल्मी दुनियेचे सर्वांगीण शिक्षण

देशातील मोठ्या शहरांतील तरुणांप्रमाणेच महाराष्ट्रातील किंवा देशातील अन्य छोटमोठी शहरे किंवा गावांतील तरुणांनाही फिल्मी दुनियेचे प्रचंड आकर्षण आहे. परंतु, फिल्मी दुनियेत काम करण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण, आर्थिक परिस्थिती किंवा मुंबईसारख्या शहरांमधील संस्थांमध्ये भरमसाट शुल्क भरून शिकणे, या तरुणांसाठी तितके जिकरीचे नाही. **नेमकी हीच बाब हेरून महात्मा गांधी मिशन संस्थेमध्ये 2018 साली फिल्म अँड आर्ट्स विभाग सुरू करण्यात आले. तज्ज्ञ मार्गदर्शक, अत्याधुनिक उपकरणे आणि एकाच छताखाली फिल्मी दुनियेचे संपूर्ण शिक्षण देण्याच्या ध्येयासह सुरू झालेला हा विभाग मराठवाड्यातील एकमेव आहे. विशेष म्हणजे, जागतिक स्तरावर सिनेमानिर्मितीसाठी आवश्यक असलेले सर्व उपकरण, तंत्रज्ञान आणि मार्गदर्शन या ठिकाणी एकाच छताखाली उपलब्ध आहे.**

## स्थापना वर्ष : २०१८

२०१८ ला औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मा.अंकुशराव कदम यांनी एमजीएममध्ये फिल्म स्कुल सुरु करण्याची घोषणा केली होती. त्यांच्याच कल्पनेतून प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक शिव कदम यांच्या नेतृत्वात या विभागाने मुहूर्तमेढ रोवली. राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक एन.चंद्रा, गिरीश कसारवल्ली, मधुर भंडारकर, चंद्रकांत कुलकर्णी, स्वीडिश कौंसिलचे बियॉन कोंड्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत या फिल्म स्कुलचे उदघाटन झाले. २०१८-१९ या शैक्षणिक वर्षांपासून विविध अभ्यासक्रमासाठी ५० विद्यार्थ्यांनी येथे प्रवेश घेतला. यतीन कार्येकर, बी लेली, किशोर कदम, चंद्रकांत कुलकर्णी, अजित दळवी, ध्रुव दत्ता, गिन्नीलाल साळुंके, नंदू भुरे, जाई देशमुख, अशोक राणे, शिव कदम यांच्यासारखी चित्रपटक्षेत्रातील दिग्गज मंडळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी लाभली आहे. एमजीएम फिल्म आर्ट ही भारतातील पहिलीच फिल्म स्कुल असेल जी संपूर्ण लांबीचा चित्रपट बनवून चित्रपटगृहात प्रदर्शित करणार आहे.

सर्वच प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध सध्या या विभागामध्ये बी.ए फिल्म मेकिंग, डिप्लोमा इन फिल्म मेकिंग, सर्टिफिकेट कोर्स इन फिल्म मेकिंग असे अभ्यासक्रम सध्या येथे उपलब्ध असून याद्वारे दिग्दर्शन, अभिनय, एडिटिंग, सिनोमॅटोग्राफी, साउंड डिझायनिंग, प्रोडक्शन डिझाईन, व्हीएफएक्स आणि ॲनिमेशन अशा विविध विषयात स्पेशलायझेशनही





करता येते. विविध चित्रपटांची निर्मिती "चिवटी', "सरगम', " जवानी जिंदाबाद', "विंग्स ऑफ फायर' या चित्रपटांसहित अनेक माहितीपटांची निर्मितीही याच विभागात करण्यात आली आहे. प्रसिद्ध साहित्यिक रा.र. बोराडे यांच्या "पाचोळा' या कादंबरीवर आधारित चित्रपटाची निर्मिती प्रकिया आजघडीला या विभागात सुरु आहे. अत्याधुनिक सोईसुविधांनी सुसज्ज सुपर थर्टी फाईव्ह कॅमेरा, ५ स्वतंत्र एडिटिंग स्टुडिओ, साउंड रेकॉर्डिंग स्टुडिओ, कलर करेक्शन लॅब, डॉल्बी फोर के प्रिव्हयु थिएटर, शूटिंग फ्लोअर, प्रोफेशनल फिल्म लाइटिंग सेटअप, क्रोमा फ्लोअर, ५ एकर जमीनीवर विस्तारलेले आउटडोअर लोकेशन यांसारख्या अनेक सुविधा येथे उपलब्ध आहेत.


• **रामेश्वर जाधव,** एमएएमसीजे

# सौंदर्याला प्रतिमेत कैद करणारा

# फोटोग्राफी विभाग

फोटोग्राफी ही एक कला आहे. हे एकमेव असे माध्यम आहे की, ज्याला भाषेची गरज नसते. मात्र यासाठी फोटोग्राफरला चांगली दृष्टी असावी लागते. त्यासाठी त्याला या क्षेत्रातील तांत्रिक शिक्षण घेणे गरजेचे असते. या क्षेत्रात शब्दांपेक्षा प्रतिमेचा जास्त प्रभाव पडतो. एक छायाचित्र हजार शब्दांपेक्षाही जास्त बोलून जाते. एक यशस्वी छायाचित्रकार बनण्यासाठी आपल्याकडे वास्तविक सौंदर्य पाहण्याची दृष्टी आणि तांत्रिक ज्ञान आवश्यक आहे. या क्षेत्रात करियर करण्याची संधी आपल्याला एमजीएम विद्यापीठाच्या 'एमजीएम फोटोग्राफी'' विभागाने उपलब्ध करुन दिली आहे.

हा फोटोग्राफी विभाग सर्व सोयींनी परिपूर्ण असून फोटोग्राफी शिकण्यासाठी लागणारे सर्वोत्कृष्ट दर्जाचे सर्व प्रकारचे साहित्य येथे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. फोटोग्राफी क्षेत्राशी संबंधित सर्व विषय सखोलतेने या विभागात शिकवले जातात. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे कॅमेरे आणि लेन्सेस उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच फोटोशूटसाठी उच्चदर्जाच्या स्टुडिओची निर्मिती या विभागात केलेली आहे. एमजीएम फोटोग्राफी विभागात विद्यार्थांना मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी प्राध्यापक



आहेत. एमजीएम फोटोग्राफी विभागाचे प्रमुख बैजू पाटील सर यांना या क्षेत्रातील २५ वर्षांचा अनुभव असून, २०१६ च्या 'वल्ड कप फोटो कॉंटेस्ट' मध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व करून सुवर्ण पदक जिंकले होते. 'आशिया फोटोग्राफर ऑफ द इयर' हा पुरस्कार दोनदा मिळवणारे ते एकमेव छायाचित्रकार आहेत. फोटोग्राफीसाठी असे अनेक पुरस्कार त्यांनी आपल्या २५ वर्षाच्या करियर मध्ये मिळवले आहेत.

एमजीएम फोटोग्राफी विभागात डिप्लोमा आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच बीए (ऑनर्स) इन फोटोग्राफी असे तीन अभ्यासक्रम उपलब्ध आहे. छायाचित्रकारिता क्षेत्रातील दर्जेदार आणि सर्वोत्कृष्ट छायाचित्रकार घडवण्याचा या विभागाचा उद्देश आहे. एखाद्या छायाचित्रकाराच्या कामात युनिकनेस असेल तर त्याला चांगले क्लाइंट्स मिळतात असे विभागप्रमुखांचे म्हणणे असल्याने ते त्या दृष्टीने वाटचाल करत आहेत.

**'एमजीएम फोटोग्राफी हा महाराष्ट्रातील परिपूर्ण फोटोग्राफी विभाग आहे. इथे जास्तीत जास्त अभ्यासक्रम प्रात्यक्षिकाच्या स्वरूपात शिकवला जातो, आणि सर्व दीर्घ अनुभवी प्राध्यापक आहेत. त्यामुळे विद्यार्थांना खूप नवीन गोष्टी या ठिकाणी शिकायला मिळतील. येत्या जानेवारी महिन्यापासून इन्स्टिटयूट मध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु होणार आहेत . त्यामुळे या क्षेत्रात आवड असणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थांनी येत्या जानेवारी महिन्यात ॲडमिशन घ्यावे '.**

**- बैजू पाटील ,**
विभागप्रमुख एमजीएम फोटोग्राफी

•**निलेश काटे,** एमएएमसीजे

# व्यवस्थापन क्षेत्रातील दिग्गज नाव आयओएम !

व्यवस्थापन क्षेत्रातील अत्यंत दर्जेदार आणि अद्ययावत शिक्षण देणारी संस्था म्हणून एमजीएम व्यववस्थापन महाविद्यालयाची (आयओएम) ओळख आहे. संस्थेला एआयसीटीई, एनएएसी मान्यताप्राप्त (ग्रेड 'ए') आणि आयएसओ 9001: 2015 मानांकन मिळाले आहे.

## स्थापना वर्ष : 1994

सर्वांगीण विकास आणि रोजगाराभिमुख उपक्रमांवर भर देत आयओएम हे व्यवस्थापन शिक्षणासाठी सर्वात पसंतीची निवड म्हणून उदयास आले आहे.व्यवस्थापन क्षेत्रात संस्थेने मिळवलेला बहुमान वाखाणण्याजोगा आहे. अनेक उद्योगांमध्ये,व्यवस्थापन क्षेत्रामध्ये संस्थेच्या विद्यार्थ्यांनी भरारी घेतली आहे. आयओएमला उच्चप्रतीवर घेऊन जाण्यासाठी येतील प्रत्येक शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे. त्याचबरोबर एमजीएम (आयओएम) ला देशातील प्रीमियर बी - स्कुल बनवण्यासाठी येथील प्रत्येक शिक्षक आणि विद्यार्थी वचनबद्ध असल्याचे या महाविद्यालयाचे संचालक कर्नल डॉ. प्रदीपकुमार यांनी सांगितले.

एआयसीटीई व इतर संबंधित मार्गदर्शक सूचनांनुसार व्यवसाय व्यवस्थापनाचे शिक्षण प्रदान करणे,राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगारक्षम विद्यार्थी निर्माण करणे, विद्यार्थ्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तसेच चांगला समाज निर्माण करण्यासाठी समाजशील विचार देण्याचेही ध्येय आयओएमने ठेवले आहे. याच अनुषंगाने या ठिकाणी सर्वप्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. सर्व सोईसुविधांनी सुसज्ज इमारत, तज्ञ मार्गदर्शक, अद्ययावत ग्रंथालय व अन्य आवश्यक बाबींमुळे हे महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांना खुणावत असते. येथून दर्जेदार शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्य करत आहेत. कार्यक्षम संसाधन व्यवस्थापन, शिक्षण क्षेत्रात सर्वसमावेशक ध्येय ठेवून कार्यक्षमता सातत्याने सुधारणे, शैक्षणिक तंत्रज्ञानाद्वारे व्यवस्थापनातील संधीसाठी विद्यार्थ्यांना तयार करणे. नवनवीन तंत्रज्ञानासोबत जोडणे, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी उपाययोजना करणे तसेच त्याला शाश्वत आकार देण्याचे काम इथे केले जाते.त्यासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यामध्ये विविध शैक्षणिक सहली, कार्यशाळा, मार्गदर्शन शिबिरे आदींचा समावेश आहे. हे महाविद्यालय नव्या एमजीएम विद्यापीठाचाच भाग असणार आहे. त्यामुळे आगामी काळात वैविध्यपूर्ण आणि बहुपयोगी अभ्यासक्रमाची रचना करून अनेक दर्जेदार विद्यार्थी घडवण्याचा या संस्थेचा मानस आहे.

▪ **योगेश टाकसाळ,** एमएएमसीजे

# कला व संस्कृती जपणारे अभिनव गुरुकुल महागामी

## स्थापना वर्ष : १९९६

आपल्या देशात प्राचीन काळापासून गुरुशिष्याची परंपरा लाभली आहे. गुरुकुल ही परंपरा जशी प्राचीन काळात होती या गुरुकुलात गुरू द्रोणाचार्यांनी अर्जुनासारखे शिष्य घडवले, तशीच गुरु शिष्यातील परंपरा या एकविसाव्या शतकात औरंगाबाद येथे असलेले 'महागामी' हे गुरुकुल जोपासत आहे.

**महात्मा गांधी मिशन या नावाजलेल्या संस्थेतील महागामी हे भारतातील सगळ्या गुरुकुलांपैकी एक मुख्य गुरुकुल आहे. गेल्या एकवीस वर्षांपासून ही शास्त्रीय नृत्य परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहचवण्याचे काम हे गुरुकुल करत आहे.**

१९९६ मध्ये महागामी गुरुकुलाची स्थापना झाली, असून ही जगातील सर्वप्रथम आयएसओ मानांकन मिळविणारी नृत्यकला संस्था आहे. आंतरराष्ट्रीय नृत्य परिषद युनेस्कोचे सभासदत्व असल्याचा मान या संस्थेला मिळाला आहे. 'कथक' आणि 'ओडिसी' या दोन नृत्यशैलीचे प्रशिक्षण येथे दिले जाते. जगभरातून तसेच देश - विदेशातून २००० पेक्षा जास्त शिष्यांनी गुरु पार्वती दत्ता यांच्याकडून नृत्याचे शिक्षण प्राप्त केले असून आज ते सक्षम प्रशिक्षक आणि कलाकार म्हणून कार्यरत आहेत. गुरु जसा सर्व कलागुणांनी संपन्न असावा लागतो व तसेच अष्टपैलू ओडिसी व कथक नृत्यांगना, गुरु आणि शोधक म्हणून तसेच नृत्य समुदायाद्वारे विचारवंत आणि समर्पित कला प्रशासक म्हणून त्या ओळखल्या जातात.

या संस्थेने आजवर अनेक पारंगत नृत्य प्रशिक्षक, संशोधक आणि कलाकारांची देखील निर्मिती केली आहे. 'अनुभूती' या कलेची जागरूकता करणाऱ्या मोहिमेमुळे १०,००० लोकांना त्याचा फायदा झाला आहे. महागामीने समाजाला दिलेल्या सेवेमुळे त्यांचे खूप कौतुक करण्यासारखे आहे. आर्थिकदृष्ट्या हलाखीच्या परिस्थितीशी लढत असलेल्या तसेच शिष्यांना त्यांनी नृत्य प्रशिक्षण दिले, आणि वेगवेगळ्या भागातील कला आणि कलाकारांनाही प्रोत्साहन दिले.



महागामीमध्ये प्रामुख्याने कथक आणि ओडिसी नृत्याचे प्रशिक्षण दिले जाते. कथक हे उत्तर प्रदेशातील पारंपरिक नृत्य आहे. हे नृत्य भारतीय शास्त्रीय नृत्य असून भारतीय परंपरेतून ८ शास्त्रीय नृत्याचा उगम झाला आहे. त्यातील एक म्हणजे कथक होय. कथक शब्दाची उत्पत्ती कथेवरून आली आहे.कथा म्हणजेच गोष्ट होय. पदन्यास वापरून कथा सांगणाऱ्या व्यक्तीपासून कथक हा शब्द आला, असे म्हटले जाते.तर ओडिसी हे प्रेमवर्धक व उत्साहपूर्ण नृत्य आहे. नाट्यशास्त्रात उल्लेख केलेल्या 'ओद्र' (आंध्र) 'नृत्य' यावरून याचे नाव पडले आहे. ओडिसी नृत्याचे सुरुवातीला काही पुरावे हे खंडगिरी-उदयगिरी या गुहांमध्ये आढळले. मंगलाचरण बटू, नृत्य, पल्लवी, मोक्ष हे त्यातील मुख्य घटक आहेत. प्रकटीकरणासाठी विविध मुद्रांचा, आसनांचा वापर केला जातो.

'महागामी' तर्फे वर्षभरात तीनशेहुन अधिक वेगवेगळे कार्यक्रम होतात, प्रशिक्षण होते. त्यातील तीन ते चार कार्यक्रम विदेशात असतात. या कार्यक्रमांच्या माध्यमातून विदेशात भारतीय शास्त्रीय नृत्याचा प्रचार आणि त्यांचे महत्व पटवून दिले जाते. महागामीचा 'शारंगदेव महोत्सव' हा कलारसिकांसाठी पर्वणीच ठरतो. शारंगदेवाने 'संगीत रत्नाकर ' या शास्त्रीय संगीतातील पायाभूत ग्रंथाची निर्मिती केली होती आणि याचा परिणाम म्हणजे शारंगदेव महोत्सव, या महोत्सवात कितीतरी दुर्मिळ वाद्य, संगीत प्रकार याचे दर्शन रसिकांना झाले. सुरबहार सारखे वाद्य जे फारसे प्रचलित नाही, रुद्रवीणा तर ऐकायलाच भेटत नाही. धृपद गायकीही फारशी कानावर पडत नाही यांचा आवर्जून समावेश या महोत्सवात पार्वती दत्ता यांनी केला आहे. तसेच 'कुडीअट्टम' ही दोन हजार वर्षांपूर्वीच्या प्राचीन नृत्यशैलीचे दर्शन या महोत्सवात होते. दरवर्षी संगीतात महत्वाची कामगिरी करणाऱ्या एका कलाकाराला 'शारंगदेव' सन्मान प्रदान करण्यात येतो.

दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबर या कालावधीत विदेशी पर्यटकांसाठी 'ऑरा- औरंगाबाद' हा शास्त्रीय नृत्यश्रृंखलेचा कार्यक्रम महागामीमध्ये घेतला जातो. परदेशी पर्यटक औरंगाबादला मोठ्या संख्येने येतात, त्यांना आपल्या कला परंपरांची ओळख व्हावी यासाठी हा उपक्रम आहे. तरुण प्रतिभावंत कलाकार आपली कला या पर्यटकांसाठी सादर करतात. कैलास लेण्यात शिवतांडव मुद्रेतील मूर्ती पाहिल्यावर पर्यटकांना जर परत संध्याकाळी शहरात आल्यावर शिवतांडव नृत्य प्रत्यक्ष पाहायला मिळाले तर त्यांना किती आनंद वाटेल. हे प्रत्यक्ष पार्वती दत्ता यांनी घडवून आणले आहे. वेरूळ अजिंठा पाहणारे पर्यटक संध्याकाळी महागामी परिसरात त्याच मुद्राकलेच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभूती घेतात त्यात भरतनाट्यम, कथक आणि ओडिसी नृत्याचे सादरीकरण केले जाते.

'महागामीत दिल्या येणाऱ्या प्रशिक्षणाची दखल जगभर घेतली जात आहे. अर्जेंटीना, मेक्सिको व ब्राझील येथील विद्यार्थ्यांनीही महागामीत प्रशिक्षण घेऊन त्यांच्या देशात गुरु-शिष्य परंपरा सुरु केली आहे. जगभरात होणाऱ्या मानाच्या महोत्सवांमध्ये 'महागामी' ला सन्मानाने आमंत्रित करण्यात येते. महागामीचे मुख्य ध्येय म्हणजे त्यात सामर्थ्यवान शिष्य साकारणे तसेच ज्यांनी अजून नृत्याला प्रारंभ केला नाही त्या शिष्यास प्रवाहात आणून त्याच्या जीवनास एक आयाम मिळवून देणे, प्रोत्साहन देणे तसेच दर्जेदार आणि गुणवत्तापूर्वक प्रशिक्षणाच्या जोरावर जगभर पोचलेले गुरुकुल म्हणून 'महागामी' ने लौकिक मिळवला आहे ही मराठवाड्यासाठी एक अभिमानास्पद बाब ठरली आहे.

• **समर्थ दहिवाळ,** एमएमसीजे

---

एमजीएम न्यूक्लिअस

# मातीला सौदर्यांचा स्पर्श देऊन कलाकुसर घडवणारे दालन

भारतात मातीला आईची उपाधी दिली जाते. मातीची पूजा केली जाते, तिच्यापासून असंख्य सुबक मुर्ती घडवल्या जातात. इतकेच काय, मातीच्या भांड्यांना तर अनादीकाळापासून महत्व आहे. **मातीवर अत्यंत सुबक अशा कलाकुसर करून त्यास सौंदर्य प्रदान करणारे विभाग म्हणजे एमजीएमचे न्यूक्लिअस**

## स्थापना वर्ष : 2016

मातीची भांडी/वस्तू बनवणे ही एक कला आहे आणि या कलेची जोपासना व वृद्धी व्हावी, या हेतूने एमजीएम संकुलात 'पॉटरी' विभाग सुरू करण्यात आले. नीलकांती पाटेकर यांच्या कल्पनेतून 'न्युक्लिअस' नावाने ६ नोव्हेंबर २०१६ रोजी हे विभाग कार्यान्वित झाले. वाराणसीतून पॉटरीचे शिक्षण घेतलेले प्रा. माखनलाल विश्वकर्मा यांच्या मार्गदर्शनात या विभागाचे काम चालते. पॉटरीचे शिक्षण घेण्यासाठी कुठल्याही कालावधीचे व वयाचे बंधन नाही. आवड व सवड पाहून इच्छूक विद्यार्थी इथे येऊन शिक्षण घेऊ शकतात. ८ दिवस, १५ दिवस, आठवड्यातून एकदा असे वर्कशॉप विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले जातात. पॉटरी विभागांत सातत्याने नवनवीन कलाकृती निर्माण करण्यावर भर दिला जातो. सध्या बंदी असलेल्या प्लास्टिकला पर्यायी वस्तू बनवून प्लास्टिक घरातून हटवण्यासाठी येथे प्रयत्न केले जात आहेत. प्लास्टिकच्या वस्तूंऐवजी मातीच्या शोभेच्या आणि दैनंदिन वापराच्या वस्तू बनवण्यावर भर दिला जात आहे. नक्षीकाम आणि डिझाईन यासाठी हा विभाग ओळखला जातो. दरवर्षी वेगवेगळे विषय घेऊन डिझाईन तयार केले जातात. २०१९ हे महात्मा गांधी यांचे १५०वे जयंती वर्ष असल्यामुळे या वर्षी गांधीजींवर आधारित डिझाईन तयार करण्यात येत आहेत. या बरोबरच औरंगाबाद शहराला या पॉटरी वर नवा चेहरा देण्यात येत आहे. गांधी आणि औरंगाबाद या दोन विषयांना घेऊन कलाकृतीची निर्मिती करण्याचे काम या वर्षी केले जात आहे.

इथे निर्माण करण्यात येणाऱ्या कलाकृतींचे प्रदर्शन भरवले जाते. स्वतःची वेगळी प्रतिमा निर्माण करत आणि शैली जपत या विभागाने एमजीएमच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

### वैभवशाली कलेचा साक्षात्कार घडवणारे बिदरी विभाग

14 व्या शतकात कर्नाटकातील बिदर येथे बिदरी ही एक धातूची जड कला विकसित झाली. अब्दुल-बिन-कैसर, इराणमधील एक कारागीर व स्थानिक बिदरी कारागीर यांच्या प्रयत्नातून या कलेचा जन्म झाला. 1960 साली आयटीआयतर्फे काही बिदरी कारागिरांना औरंगाबाद शहरात बोलवण्यात आले. यामुळे 1960- 90 या काळात शहरात बिदरी कला बहरत होती. कालांतराने शासनाने त्यास आश्रय देणे बंद केल्याने बिदरी व्यवसायाला उतरती कळा लागली. शहराला लाभलेल्या बिदरी कलेला व कारागिराला जिवंत ठेवण्यासाठी अंकुशराव कदम यांनी स्वतहून कारागीर यूसुफ जाफरी यांना एमजीएम परिसरात बिदरी केंद्र उभारण्यासाठी निमंत्रित केले. 2018 साली सुरू करण्यात आलेल्या या विभागात आज दागदागिने, पेपर वेट, कफलिंग, फ्लॉवर पॉट, पेपर कटर, मेणबत्ती स्टॅण्ड, लेटर बॉक्स व अन्य शोभेच्या वस्तु बनविण्यात येतात. तसेच या वस्तु विक्रीसाठी उपलब्ध असून, ग्राहकांच्या मागणीप्रमाणे हव्या त्या वस्तु बनवून देखील देण्यात येतात. सध्या या विभागात केवळ हौशी कलावंतांना कार्यशाळांच्या माध्यमातून बिदरी कला शिकवण्यात येते. अत्यंत नाजूक व मेहनतीने केलेले सुबक काम हे बिदरी कलेचे वैशिष्ट्य आहे. 90% झिंक व 10% कॉपर असे प्रमाण असलेल्या विविध आकारांवर सोने, चांदी वापरून कलाकुसर केली जाते. सोन्याचे काम हे ग्राहकांच्या मागणीप्रमाणेच केले जाते. एमजीएममुळे बिदरी कला आज पुन्हा औरंगाबाद शहरात बहरत आहे.

**– वेदिका मोताळे, कल्याणी पवार,** बीएएमसीजे

---

एमजीएम खादी व फॅशन डिझाइन

# खादीला नवोन्मेशाची जोड, फॅशनला शिक्षणाचा आधार

खादी हा महात्मा गांधी यांच्या जीवनसुत्रीचा अविभाज्य भाग आणि गांधीजी हे एमजीएमच्या जिव्हाळ्याचा विषय. या दोन्ही तत्वांचा आधार घेत एमजीएममध्ये स्वतंत्र खादी विभाग सुरू करण्यात आला आहे. **या ठिकाणी खादीच्या संवर्धनासोबतच निर्मिती आणि प्रसारही केला जातो. सोबतच फॅशन डिझायनिंगच्या अभ्यासक्रमातून दर्जेदार डिझायनरही घडवले जातात.**



## स्थापना वर्ष : 2009

महात्मा गांधी यांनी आयुष्यभर खादीचा अंगीकार केला. त्याचा प्रचार आणि प्रसारही केला. महात्मा गांधी मिशन ही संस्थाही गांधीजींच्या तत्वांवरच काम करते. म्हणूनच एमजीएममध्ये खादीसाठी स्वतंत्र विभागाची रचना करण्यात आली. या विभागात खादीची निर्मिती केली जाते. खादीचे संवर्धनही केले जाते आणि प्रसार व प्रचारही केला जातो. हे विभाग हातमागावर कलाकुसर करणाऱ्या कारागिरांसाठी खूप जिव्हाळ्याचे आहे. कारण, या ठिकाणी हातमागावर पैठणी साड्यांसह अन्य वस्त्रनिर्मितीही केली जाते. शिवाय, अन्य साधनांच्या मदतीने खादीपासून वस्त्रे बनवली जातात. या वस्त्रांची विक्रीही केली जाते. शिवाय, ठराविक कालावधीत त्यांचे प्रदर्शनही भरवले जाते.

याच विभागामध्ये फॅशन डिझायनिंगचे विविध अभ्यासक्रमही राबवले जाते. शिवणकामापासून ते विविध प्रकारच्या फॅशन तसेच काळानुरूप बदलत असलेल्या अनेक अद्ययावत बाबींचे याठिकाणी विधिवत प्रशिक्षण दिले जाते. आजवर हजारो विद्यार्थ्यांनी या ठिकाणी फॅशन डिझायनिंगचा अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी मिळवली आहे. या प्रशिक्षणाच्या बळावर अनेकजण विविध क्षेत्रांमध्ये भरीव कामगिरी करत आहेत. अनेकांनी फॅशनच्या क्षेत्रामध्ये एमजीएमचे नाव उज्ज्वल केले आहे. फॅशनचा आजवरचा संबंध मुंबई, दिल्लीसारख्या मोठमोठ्या शहरांशीच जोडला जायचा. त्यासाठीचे अभ्यासक्रमही याच शहरांमध्ये उपलब्ध होते. परंतु, तळागाळातील होतकरू विद्यार्थ्यांनाही या क्षेत्रात जाता यावे, हे ध्येय घेऊन 2009 साली हा विभाग कार्यान्वित झाला. आता एमजीएम विद्यापीठ अस्तित्वात आल्याने या विभागातही नवीन अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत. यंदापासून प्रथमच बीडीएस (बॅचलर ऑफ डिझाइन्स) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. अशाप्रकारचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर फॅशन डिझाईन्स, फॅशन कम्युनिकेशन, टेक्सटाईल अश्या विविध शाखांमध्ये काम करता येईल. फॅशन कम्युनिकेशन आणि फॅशन मर्चंटायझिंगवर आधारित पदव्यूत्तर अभ्यासक्रमही विद्यार्थ्यांना शिकता येऊ शकेल.

• **अंकिता कोठारे, नागेश चामे,** एमएएमसीजे

---

एमजीएम हॉटेल मॅनेजमेंट

# पाककला, आदरातिथ्य प्रशिक्षणाचे सृजनशील विभाग

पर्यटन, आदरातिथ्य आणि पाककला या सध्याच्या काळातील अत्यंत महत्वपूर्ण बाबी बनल्या आहेत. व्यक्तीचा या तीनही बाबींही जिव्हाळा असतोच. **नेमकी हीच बाब हेरून पाककला आणि आदरातिथ्यासह पर्यटनासंदर्भात अत्यंत सृजनशील प्रशिक्षण देणारे एमजीएम हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालय नावारुपाला आले आहे.**

## स्थापना वर्ष : 2016

हॉटेल मॅनेजमेंटच्या देशभरातील नामांकित संस्थांमध्ये एमजीएम हॉटेल मॅनेजमेंटचा समावेश आहे. या महाविद्यालयात दर्जेदार अभ्यासक्रम, प्रशिक्षित कर्मचारी, अद्ययावत सुविधा उपलब्ध असून अनेक उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना काळानुरूप शिक्षण मिळावे, या उद्देशाने विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या नामांकित शेफला विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित केले जाते. वैभव गुप्ते, अभिषेक उपाध्याय आदींचा यामध्ये प्रामुख्याने समावेश आहे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षणार्थी म्हणून काम करण्याची संधी हे महाविद्यालय उपलब्ध करून देते. पंचतारांकित हॉटेल्ससह भारताच्या बाहेरही विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी पाठवले जाते. शहरातील तसेच अन्य भागातील हॉटेल्सशी या महाविद्यालयाचा जवळचा संबंध आहे. याचा फायदा येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तसेच रोजगारासाठी होतो. या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या इतर कलागुणांना वाव मिळण्यासाठी त्यांना एमजीए ऑलिम्पिकसारखे व्यासपीठदेखील लाभले आहे. सध्या या ठिकाणी ८७० विद्यार्थी शिक्षण घेत असून शेकडो विद्यार्थी नामांकित ठिकाणी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसायही उभारला आहे. याचवर्षी एमजीएम संस्थेला खासगी विद्यापीठ म्हणून मान्यता मिळाली असून एमजीएम हॉटेल मॅनेजमेंटही आता याच विद्यापीठाचा भाग असेल.

विविध प्रकारच्या खाद्य महोत्सवासाठी एमजीएम हॉटेल मॅनेजमेंट विभाग सर्वदूर प्रसिद्ध आहे. यात फूड फेस्टिवल, पिझ्झा फूड फेस्टिवल, फूड सर्व्हिस इत्यादींचा यात प्रामुख्याने समावेश आहे.. त्याचबरोबर महाविद्यालयाअंतर्गत हॉस्पिटॅलिटी प्रीमियर लीग, स्पोर्ट्स डे, वृक्षारोपण तसेच रक्तदान शिबिर असे अनेक उपक्रमही राबवले जातात. विविधांगी अभ्यासक्रमांचे आकर्षण एमजीएम हॉटेल मॅनेजमेंटमध्ये तीनवर्षीय पदवी अभ्यासक्रम, पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. शिवाय, बी.एसस्सी हॉटेल ऑपरेशन्स, बी.एसस्सी हॉस्पिटॅलिटी स्टडीज्, बीबीए एविएशन अँड टुरिजम मॅनेजमेंट तसेच अन्य अभ्यासक्रमेही सध्या महाविद्यालयात शिकवली जातात.





### एकाच छताखाली संपूर्ण शिक्षण देण्याच्या उद्देश

कौशल्यपूर्ण शिक्षण देणे हेच एमजीएमचे ध्येय आहे. विद्यापीठ म्हणून मान्यता मिळाली हे अनेक वर्षांच्या मेहनतीचे फळ आहे असून आम्ही आता याच विद्यापीठाचा भाग असणार आहे. त्याच अनुषंगाने आमचे पुढचे मार्गक्रमण असणार आहे. सेवाक्षेत्रामधील गुणवत्ता वाढवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या सोबतीने कौशल्यपूर्ण शिक्षण देणे हे आमचे ध्येय राहील, अशी प्रतिक्रिया प्राचार्य रुपेश भावसार यांनी दिली.

• **पूजा आहेर, वैष्णवी राऊत,** बीएएमसीजे

---

## स्थापना वर्ष : 1983

दर्जेदार शिक्षण, अद्ययावत तंत्रज्ञान, सर्वोत्तम शिक्षक आणि तितकेच दर्जेदार विद्यार्थी आणि शिस्त या सर्वांच द्योतक म्हणजे जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय अर्थातच जेएनईसी. एमजीएम संस्थेचे नाव जिथे जिथे घेतले जाते तिथे तिथे जेएनईसीचा हमखास उल्लेख होतो. केवळ औरंगाबादच नव्हे तर भारतातील अव्वल अभियांत्रिकी शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये जेएनईसीचा क्रमांक लागतो. **उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण, व आधुनिक यंत्रसामुग्री अद्ययावत प्रयोगशाळा आणि भव्य वाचनालय या सर्व सुविधा जेएनईसीला वेगळपण देतात.**

# दर्जेदार शिक्षण व शिस्तीचे द्योतक जेएनईसी

शिक्षणाने नव्या जगाचे नवे पैलू लक्षात घेऊन दर्जात्मक शिक्षण आणि परिपूर्ण विदयार्थी घडविण्यासाठी महाविद्यालयात विशेष मेहनत घेण्यात येते. शिक्षणातून समाजाचा विकास व्हावा आणि आदर्श विद्यार्थी निघावे यासाठी संशोधनाचे महत्व लक्षात घेवून जेएनईसीचे संशोधन केंद्रसुद्धा एमजीएमने उभे केले आहे

जेएनईसीने आजवर हजारो उत्तम विद्यार्थी घडवले असून अनेक नामांकित कंपन्या, संस्था, संघटनांमध्ये येथील विद्यार्थी उच्च पदांवर कार्यरत आहेत. या शिवाय विदेशातही अनेक विद्यार्थी कार्यरत आहे. अनेकांनी स्वतंत्र व्यवसाय सुरू करत अनेकांच्या हातांना रोजगारही दिला आहे.





मूल्यात्मक आणि दर्जात्मक शिक्षण देऊन तांत्रिक मनुष्यबळ निर्माण करणं हाच महाविद्यालयाचा मुख्य उद्देश आहे. संशोधन करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांसाठी २३ कार्यशाळा आहेत . ५२ विविध क्षेत्रातील, मान्यवरांनी विविध विषयांवर मार्गदर्शन दिले आहे. २०१८ ते १९ या काळात ८ प्रकल्प झाले आहेत. यात ६६ शोधप्रबंध प्रकाशित झाले आहे . विविध शाखांमध्ये कौशल्य-विकास विषयांवर व्याख्यान घेतले आहे .

विद्यार्थ्यांमधील उपजत कलागुणांना वाव मिळावा यासाठी 'रझमताज' स्नेहसंमेलन घेतले जाते याचीच कल्पना घेत अनेक इंजिनिअरिंग संस्थांनी वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यास सुरुवात केली . त्याच बरोबर राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात. त्यात स्पंदन, नाटक क्लब, संगीत क्लब आणि पर्यावरण संरक्षण जनजागृतीसाठी ग्रीन क्लबचा समावेश आहे . या वर्षी जेएनईसीमध्ये पार पडलेला सर्वात महत्वाचा उपक्रम म्हणजे टेडेक्स. मराठवाड्यातून याला सुरवात झाली. विविध क्षेत्रातील नामांकित आणि वेगळेपण जपणाऱ्या लोकांना एकत्र आणणे हा याचा उद्देश आहे.

यांत्रिक आणि उत्पादनाचे घटक उपलब्ध करून देण्यासाठी सेंट्रल वर्कशॉप सुरु केले आहे. याशिवाय, येथील विद्यार्थ्यांनी संशोधन करू बनवलेले अनेक यंत्र, वस्तू नेहमीच चर्चेचा विषय ठरतात. एकंदरितच हे विभाग म्हणजे शिक्षण आणि संशोधनाचे महत्वाचे केंद्र ठरत आहे.

### पुरस्कार

**१) विजया मुसंडे : राजमाता जिजाऊ पुरस्कार २०१९ फेब्रुवारी , सर्वोत्कृष्ट विभाग प्रमुख पुरस्कार २८ सप्टेंबर २०१९**

**२)परमिंदर कौर बेस्ट TPO अवॉर्ड २८ सप्टेंबर २०१९**

• **सुदर्शन प्रधान,** एमएएमसीजे

# विस्तीर्ण मैदान, अद्ययावत सुविधांनी सुसज्ज स्पोर्ट्स क्लब

**एमजीएम क्रीडा विभाग**

सर्वप्रकारच्या खेळांसाठी एकाच छताखाली सर्व सुविधा, तज्ज्ञ मार्गदर्शकांचे प्रशिक्षण मिळून उत्तम खेळाडू घडावेत, या उद्देशाने एमजीएममध्ये स्पोर्ट्स क्लबची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवून ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये भारताचा दबदबा निर्माण व्हावा तसेच शहरातील होतकरू खेळाडुंना शहरातच मैदान, प्रशिक्षण व इतर सुविधा मिळाव्यात या हेतूने संस्थेत एमजीएम क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात आली. **अत्यंत मनमोहक आणि तितक्याच सुविधांनी सुसज्ज असलेले हे विभाग एमजीएमसोबतच शहराच्या वैभवात मोलाची भर पाडत आहे.**

शिस्त आणि संयमासाठी शारिरीक आणि बौद्धीक या दोन्ही बाबींवर तितकेच नियंत्रण असणे आवश्यक असते. विविध कसरती, व्यायाम आणि खेळांच्या माध्यमातून ते मिळवता येते. शिक्षणासोबतच हे कौशल्यही अवगत व्हावे, यासाठी एमजीएम स्पोर्ट्स क्लबची स्थापना करण्यात आली. युवा खेळाडूंसह शहरातील व्यावसायिक, डॉक्टर्स, इंजिनियर्स आणि क्रीडाप्रेमीदेखील येथे येतात. केवळ सुविधांयुक्त मैदानेच एमजीएमद्वारे उपलब्ध करून दिली जात नाहीत. तर, त्यासोबतच अनुभवी आणि खेळाप्रती निष्ठा असणारे प्रशिक्षकदेखील क्रीडा संकुलात कार्यरत आहेत. टेनिस प्रशिक्षक निलेश हारदे, क्रिकेट प्रशिक्षक सागर शेवाळे, फुटबॉल प्रशिक्षक रहिम खान, रायफल शूटिंग प्रशिक्षक संग्राम देशमुख, जॉय थॉमस, मनीष पोलकम हे सध्या एमजीएम क्रीडा संकुलात खेळाडू घडविण्याचे कार्य करत आहेत. खेळांच्या प्रशिक्षणाबरोबरच खेळाडूंनी त्यांच्या आहाराचे नियोजन गरजेप्रमाणे करावे, शारीरिक तंदुरुस्ती असावी याचा विचार करून खेळाडूंसाठी डाइट प्लॅन, जिमची सोयदेखील करण्यात आलेली आहे.

सर्व सुविधांनी परिपुर्ण असणाऱ्या या क्रीडा संकुलातील खेळाडू आज विविध खेळांमध्ये राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय स्तरावर एमजीएमचे, औरंगाबाद शहराचे नाव उंचावत आहे. पुढील वर्षी नांदेड येथे होणाऱ्या सौरभ बर्वे, सलिम आमेर यांची राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेकरिता निवड झाली असून, राजस्थांनातील कोटा शहरात BATU विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व मृणाल अंधारे, कल्याणी वडगावकर करणार आहे. नैशनल लॉन टेनिस स्पर्धेत पारस फुरसुले याने सुवर्णपदकाची कमाई केली आहे. क्रीडा संकुलातील ओमकार पाटकळ याने नुकत्याच







झालेल्या विजय मर्चंट ट्रॉफी मध्ये 16 वर्षातील वयोगटात महाराष्ट्र संघात स्थान मिळवले. त्याचबरोबर नैशनल क्रिकेट अकादमीच्या (BCCI) इंडिया वेस्ट झोन संघात २०१८-१९ साठी देखील त्याची निवड झाली आहे. वयाच्या 11 व्या वर्षापासून एमजीएम क्रीडा संकुलात सरावासाठी येणाऱ्या ओमकार ला संकुलातील क्रिकेट प्रशिक्षक सागर शेवाळे यांचे मार्गदर्शन मिळाले. आपल्या पाल्याला केवळ पुस्तकी ज्ञानात न अडकवता त्याची आवड- निवड पाहून त्याला आधार देणारे आई- वडील कोणत्याही खेळाडूसाठी प्रेरणादायी असतात. त्याप्रमाणेच कल्याण- उषा पाटकळ यांनी ओमकारला आधार देत त्याच्या स्वप्नांची वाट दर्शवली. यंदा बारावीचे वर्ष असून सुध्दा रोज न चुकता सकाळ- संध्याकाळ सराव करून अभ्यासाकडे लक्ष देणारा ओमकार त्याच्या या यशामध्ये प्रोत्साहन देणाऱ्या प्रशिक्षकांचा, एमजीएममधील निकोप अन उत्साही आधाराचा मोठा वाटा असल्याचे आवर्जून नमूद करतो. सर्व सोईसुविधा एकाच छताखाली बॅडमिंटन कोर्ट, क्रिकेट स्टेडियम, स्विमिंग पूल, सॉफ्ट टेनिस, रायफल शूटिंग, गोल्फ क्लब, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, फेन्सिग इत्यादी सुसज्ज खेळांची मैदाने आज घडीला उद्याची प्रभावशाली खेळाडू घडवत आहे.

• **कल्याणी पवार,** बीएएमसीजे

# डिजिटल अन् अद्ययावत शिक्षणाचे माहेरघर
## जी. वाय. पाथ्रीकर संगणक महाविद्यालय

**स्थापना वर्ष : 2001**

देशाची प्रगती करण्यासाठी संशोधनाला तंत्रज्ञानाची जोड असणे गरजेचे असते. त्यासाठी विविध नवोपक्रम राबवण्याची एमजीएमची परंपरा अविरत सुरू आहे आणि याचाच एक भाग आहे जी.वाय. पाथ्रीकर संगणकशास्त्र व तंत्रज्ञान महाविद्यालय. **संपूर्ण अद्ययावत सोईसुविधांनी सुसज्ज अशा तंत्रज्ञानासह शिक्षण देण्याची या महाविद्यालयाची परंपरा आहे.**

एमजीएम संस्थेच्या उभारणीत मोलाचे योगदान देणारे डॉ. जी.वाय. पाथ्रीकर यांच्या स्मरणार्थ या महाविद्यालयाला त्यांचे नाव देण्यात आले. दुरदृष्टी असलेल्या या व्यक्तीच्या नावाप्रमाणेच महाविद्यालयाची वाटचालही सध्या सुरू आहे. अद्ययावत असे तंत्रज्ञान, आधुनिक उपकरणे आणि दर्जेदार अध्यापनाच्या मिश्रणाने या महाविद्यालयाने देशभरात नावलौकिक मिळवले आहे.

प्राचार्य डॉ. प्राप्ती देशमुख यांच्या मार्गदर्शनात कार्यरत या महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास हाती घेतलेला आहे. सध्या या महाविद्यालयामध्ये कम्प्युटर सायन्स, आयटी आणि ॲनिमेशन हे तीन मुख्य विभाग कार्यरत आहेत. कम्प्युटर सायन्स विभागात बी.एसस्सी कॉम्प्युटर आणि बी.एसस्सी हार्डवेअर नेटवर्किंग हे अभ्यासक्रम शिकवले जातात. तर, आयटी विभागात बी.एसस्सी आयटी, एमएस-सीआयटी हे अभ्यासक्रम शिकवले



जातात. बायोटेक्नॉलॉजी विभागांतर्गत एम.एसस्सी बायोटेक्नॉलॉजी, एम.एसस्सी बायॉइन्फॉर्मेशन या अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाविद्यालयात विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. यात क्रीडा, सांस्कृतिक तसेच सेवाविषयक उपक्रमांचा प्रामुख्याने समावेश आहे. ८० लाख ई-बुक्सचा भंडार, रोबोटीक क्लब संगणक किंवा तंत्रज्ञानासोबत असतानाच वाचन, लेखनाशीही विद्यार्थी कायम जोडलेले असावे. या अनुषंगाने या महाविद्यालयामध्ये तब्बल ८० लाख ईबुक्सचा संग्रह करण्यात आला आहे. त्यामध्ये पुस्तकांसह ऑडिओ- व्हिज्युअल बाबींचाही समावेश आहे. विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान मिळावे आणि त्यासाठी अध्यापकांनाही संशोधन करता यावे, या उद्देशाने या महाविद्यालयामध्ये प्राध्यापकांसाठी स्वतंत्र संशोधन केंद्र स्थापण्यात आले आहे. महाविद्यालयात कॉम्प्युटर लॅब, हार्डवेअर लॅब, ॲनिमेशन लॅबसह e- यंत्रणा लॅबही कार्यान्वित आहे. शिवाय, अत्याधुनिक तंत्रज्ञानासह विकसित असलेले रोबोटिक क्लबही येथे कार्यान्वित आहे.

**10 हजार गुणवंत विद्यार्थ्यांचा वारसा** : जी. वाय. पाथ्रीकर महाविद्यालयामध्ये मागील १८ वर्षांच्या काळात सुमारे १० हजार ४०० विद्यार्थी शिकून बाहेर पडले असून विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवत आहेत. काही विद्यार्थी विदेशातील कंपन्यांत कार्यरत आहेत. तर, अनेकांनी स्वतःचा उद्योग उभारला आहे.

• **निविदिता केलापूरे, सुहानी पवार**, बीएएमसीजे

# शाश्वत शेतीचा नवोन्मेष
## नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय

भारतात 80 टक्के लोक आज कृषी आणि कृषीवर आधारित व्यवसायांवर अवलंबून आहेत. हरित क्रांतीनंतर देशाच्या अन्नधान्य साठ्यात वाढ झाली . कृषी क्षेत्रात अनेक नवनवीन शोध लागले.यामुळे भारत हा अन्नधान्य संपन्न देश झाला. असे म्हणावयास हरकत नाही.**शेतीमध्ये अजून नवनवे शोध लावण्यासाठी तसेच प्रत्येक भागातील शेती शाश्वत करण्यासाठी कृषी महाविद्यालयांची निर्मिती होऊ लागली.**

**स्थापना वर्ष :2012**

देशातील शेतकरी हा विकसित शेतीच्या मार्गाकडे आला पाहिजे. या दृष्टिकोनातून 2012 मध्ये गांधेलीमध्ये नानासाहेब कदम कृषी महाविद्यालयाची सुरवात झाली. डोंगराळ भागातील सुमारे ७५ हेक्टर क्षेत्र या महाविद्यालयाने कृषी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ओलिताखाली आणि काहीभाग जो शेतीयोग्य बनवला आहे. महाविद्यालय ५४.६५ एक्कर परिसरात या महाविद्यालयाचे क्षेत्र पसरलेले आहे. वेळोवेळी परिसरातील शेतकऱ्यांना शाश्वत शेतीबद्दल मार्गदर्शन करणे. माती परीक्षणाचे महत्व समजावुन सांगणे.कीटकनाशकांची योग्य प्रमाणात फवारणी करणे. विविध शेतीपूरक व्यवसाय कसे करावे यासाठी कार्यशाळा घेण्याचे कार्य महाविद्यालय करत असते. याचबरोबर शेतकऱ्यांनी विविध प्रयोग आपल्या शेतीत घ्यावे यासाठी महाविद्यालय त्यांना प्रोत्साहन देत असते. त्यामध्ये रेशीम शेती, कमी पाण्यातील पिके घेण्याचे फायदे, आळंबी उत्पादन, सूर्यफुलाची शेती, लसूण लागवड, हायड्रोफोनिक चारा, ऑरग्यानिक शेती इत्यादी प्रयोगांसाठी प्रोत्साहन देत आहे. महाविद्यालयात कृषी रसायन व मृदाशास्त्र, कृषी विस्तार शिक्षण, कृषी कीटकशास्त्र, कृषी वनस्पती विकृतीशास्त्र, कृषी अर्थशास्त्र, कृषी अभियांत्रिकी व पशुविज्ञान दुग्धशास्त्र अशा प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र प्रयोशाळा आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या विषयात प्रयोग करण्याच स्वतंत्र मिळतं. वृक्षारोपण , रक्तदान शिबीर , कृषिदिन ,जलसंवर्धन, आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. येथील विद्यार्थ्यांची जागतिक स्थरावर निवड झालेली आहे. प्रशस्थ ग्रांथालय यामुळे विद्यार्थी नेहमी अभ्यासशील वातावरणात असतो. येथील अनेक विद्यार्थी शासकीय तसेच निमशासकीय नोकरीत रुजू आहेत. आणि आज ते महाविद्यालयाचे नाव जागतिक पातळीवर नोंदवत आहेत.

**स्थापना वर्ष : 2016**

# मातृरूपी अन्नपूर्णेचा स्पर्श म्हणजे... 'मदर टच'

तंत्रज्ञानाच्या या शतकात काळाच्या वेगाचा पाठलाग करताना पौष्टिक अन्न, निरोगी जीवनाकडे साहजीकच दुर्लक्ष केले जाते. फास्ट फूडचा आरोग्यावर दुष्परिणाम होतो. एमजीएममधील विद्यार्थी निरोगी राहावेत व त्यांना घरच्या जेवणाची चव मिळावी, यासाठी बचत गटाच्या माध्यमातून मदर टच हे केंद्र चालवले जाते.

विविध महाविद्यालयांचा समावेश असणाऱ्या एमजीएम विद्यापीठात हजारोंच्या संख्येत विद्यार्थी आहेत. यात वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे तरुणाईने फास्ट फूड टाळावे, त्यांना पौष्टिक अन्नाचा पर्याय उपलब्ध व्हावा, या हेतूने एमजीएम विद्यापीठ परिसरातच घरच्या जेवणाची चव देणारे 'मदर टच' पोळीभाजी केंद्र सुरू करण्यात आले. खासदार सुप्रिया सुळे यांच्या यशस्विनी सामाजिक अभियानांच्या वतीने राज्यातील महिलांना सक्षम बनविण्याकरिता नेहमीच विविध विचारांना, कल्पनांना प्रोत्साहन दिले जाते.

या अभियनांच्या मराठवाडा विभागातील सम्नवयिका रंजना राजपूत आणि एमजीएम विद्यापिठाचे विश्वस्त अंकुशराव कदम यांच्या विचारातून बचत गटातील महिलांना रोजगार मिळावा, समाजात त्यांचे अस्तित्व खंबीरपणे तग धरून राहिल या उद्देशाने २०१७ साली मदर टच हे केंद्र साकारण्यात आले. घरापासून दूर असतानाही घरच्या चवीच्या जेवणाची उणीव भरून काढणारे अन् कमी किमतीत पौष्टिक अन्न या केंद्रात देण्यात येत असल्यामुळे विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी आणि इतरही जण मोठ्या आवडीने येथील पदार्थांचा आस्वाद घेतात. वडापाव, समोसा असे तळलेले पदार्थ खाणाऱ्या युवकांना आवडतील असे आणि घरगुती चवीचे



पदार्थ अगोदर देण्यात येत असे. मात्र, कालांतराने विद्यार्थ्यांच्या मागणीप्रमाणे इतर विविध पदार्थही अगदी कमी दरात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वडापावच्या किमतीत मिळणारा भाजी पोळीचा चविष्ट रोल विद्यार्थ्यांच्या पसंतीचा असून इतरही पदार्थांचा आस्वाद विद्यार्थी घेत असतात. सद्यस्थितीत एकूण १५ महिला मदर टचमध्ये कार्यरत असून बचत गटाच्या पायावर उभारलेले हे केंद्र दिवसेंदिवस प्रगती करत आहे. विद्यार्थ्यांना तर या केंद्रामुळे चविष्ट व पौष्टिक जेवण मिळतेच मात्र मदर टच चालवणाऱ्या महिलांना रोजगारही प्राप्त होत आहे.

• **कल्याणी पवार,** बीएएमसीजे

**स्थापना वर्ष : 2007**

# सेवेचा वसा घेतलेले नर्सिंग महाविद्यालय

वास्तविकेतत जीव वाचवणारा देव म्हणून वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तीकडे बघितले जाते. अत्यंत निर्मळ आणि निस्वार्थी क्षेत्र म्हणून याकडे बघितले जाते. या क्षेत्रात तितकेच दर्जेदार मनुष्यबळ घडावे, या हेतूने उभारलेल्या नर्सिंग महाविद्यालयाने नावलौकिक मिळवले आहे.

आरोग्याशी संबंधीत गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी मदर तेरेसा नर्सिंग कॉलेज आणि इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन या संस्थेची स्थापना केली. मानवी समाज जीवनात समाजसेवेसाठी उत्कृष्ट व विषयाशी परिपूर्ण ज्ञान असणारे व सामाजिक भान असलेले विध्यार्थी घडवून देशाच्या जडणघडणीत त्याचा मोलाचा वाटा उचलणारे विदयार्थी घडताहेत हेच या संस्थेचे वैशिष्ट्य आहे. येथे एएनएम व जीएनएम, बीएस्ससी नर्सिंग, एमएसस्सी नर्सिंग अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

मदर तेरेसा कॉलेज ऑफ नर्सिंग हे महाविद्यालय शैक्षणिक अभ्यासक्रमा सोबतच विद्यार्थ्यां मध्ये नवचैतन्य नेतृत्व निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यासोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व मनोरंजन यांचे आयोजन केले जाते. त्यासोबतच विविध प्रकारचे सेमिनार, वर्ल्ड मेंटल हेल्थ डे, ऑर्गन डोनेशन डे, वार्षिक स्नेह संमेलन, अशा विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात.

हे महाविद्यालय सगळ्याच बाबतीत परिपूर्ण असून सुसज्ज इमारत, तंत्रज्ञाने विकसित क्लासरूम, हॉस्टेल, सोयी-सुविधायुक्त कॉम्पुटर लॅब, लेबॉरटरी, पार्किंग व्यवस्था, इंटरनेट,. उच्च प्रशिक्षित व अनुभवी प्राध्यापक वर्ग, ८००० पेक्षा जास्त पुस्तक असलेले सुसज्ज ग्रंथालय असून राज्य, देश, विदेशातील लेखकांची पुस्तके उपलब्ध आहेत. आरोग्यासोबतच विविध क्रीडा प्रकार व कब्बडीसारख्या मैदानी खेळामध्ये काही खेळाडूंची राज्यस्तरापर्यंत निवड झाली आहे. दर्जेदार शिक्षणासोबत दुरदृष्टीच्या संकल्पनेतून या महाविद्यालयाची वाटचाल सुरू आहे.

• **राहूल उ. जाधव,** एमएएमसीजे

### दर्जेदार रुग्णसेवेचे व्रत

एमजीएम नर्सिंग महाविद्यालयातून आरोग्याच्या दृष्टीने रुग्णसेवेचा पाया असणारी परिचारक व परिचारिका घडवणे. विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी उत्तम व दर्जेदार शिक्षण देणे, नवचैतन्य निर्माण करणे आणि नेतृत्व प्रदान करणे. ज्यामुळे राज्य, देश व एकूणच राष्ट्रीय पातळीवर आरोग्य सुधारेल यासाठी प्रयत्न करणे हे या दोन्ही महाविद्यालयाचे प्रमुख ध्येय आहे.

**डॉ. अनुराधा एन म्हस्के,** प्राचार्य, मदर तेरेसा नर्सिंग कॉलेज

**संस्कारशील 'शिस्त'**

# शिस्त अन् सुरक्षा जपणारे एमजीएम सुरक्षा विभाग

शिक्षण आणि शिस्त ह्या दोन्ही एकमेकांशी निगडित गोष्टी आहेत. शिक्षण घेताना शिस्त पाळावी लागते आणि शिस्त पाळायलादेखील शिक्षण घ्यावं लागतं. परंतु शिस्त ही स्वतः अंगी बाणणे कठीण असते. **यासाठी शिस्त लावायला कोणाची तरी गरज भासते. एमजीएम विद्यापीठात शिस्त लावण्याची भूमिका बजावतो तो म्हणजे सुरक्षा विभाग.**

परिसरातील प्रत्येक विभाग, सोईसुविधा, वाहनतळांपासून अगदी विद्यार्थी, कर्मचाऱ्यांपर्यंत प्रत्येक बारीकसारिक गोष्टींत शिस्त लावण्याचे काम सुरक्षा विभागाद्वारे केले जाते. विद्यापीठात अनेक महाविद्यालये व विभाग आहेत. प्रत्येक विद्यालयात किमान २००० विद्यार्थी शिक्षण घेतात. या विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि शिस्त यासाठी प्रत्येक महाविद्यालयात एका सुरक्षारक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे. विद्यापीठ परिसरात एकूण ७२ सुरक्षारक्षक तैनात आहेत. या रक्षकांना प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या विभागांवर गस्त दिली जाते. या विभागाचे काम तीन टप्प्यांत चालते. विद्यापीठात बाहेरून येणाऱ्या वाहनांची नोंददेखील सुरक्षारक्षकांद्वारे ठेवली जाते. विद्यार्थ्यांना शिस्त लावणे, पार्किंग व्यवस्था पाहणे, देखरेख करणे ही कामे ही रक्षक पार पाडतात. विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या गाड्या शिस्तीत लावल्या जातात. विद्यापीठातील मुलींच्या सुरक्षेची विशेष काळजी घेतली जाते. इतर विद्यापीठांच्या तुलनेत एमजीएम विद्यापीठात मुली सर्वाधिक सुरक्षित आहेत. सुरक्षारक्षकांद्वारे मुलींच्या सुरक्षिततेवर विशेष लक्ष दिले जाते. मुलींसाठी हॉस्टेल परिसरात जवळपास १५ महिला सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने विद्यापीठ परिसरात एकूण २५०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. याची देखरेख सुरक्षा विभागाच्या मुख्य कार्यालयाद्वारे ठेवली जाते. विद्यापीठातील सर्व हालचालींवर नजर ठेवण्याचे काम सुरक्षा विभाग प्रमुख खान सर करतात.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबरोबरच हरवलेल्या वस्तू, गाड्या, तक्रारी यांचीदेखील दखल हा विभाग घेतो. सुरक्षा रक्षकांसाठी विशेष गणवेश दिलेला आहे. त्यामुळे ते लवकर ओळखायला येतातच पण त्याबरोबरच त्यांच्या या गणवेशाचा विशेष प्रभाव शिस्तीवरदेखील पडतो. विद्यापीठाची सुरक्षितता प्रबळ ठेवण्यासाठी आणि शिस्त लावण्यासाठी या विभागाचा मोठा वाटा आहे.

• **वेदिका मोताळे,** बीएएमसीजे



### शिस्त, काळजीवरच आमचा भर

प्रत्येक विद्यापीठांत शिस्त आणि सुरक्षा महत्त्वाची असते. त्यामुळे एमजीएमच्या सुरक्षेवर विशेष लक्ष दिले जाते. विद्यार्थी, कर्मचारी, येणारे - जाणारे प्रत्येकाच्या सुरक्षेची विशेष काळजी घेतली जाते.

**फशीउद्दीन खान,** सुरक्षाविभाग प्रमुख.

**संपादकीय मंडळ** • अद्नान खान (छायाचित्रकार), महेंद्र भंडारे, विशाल जाधव, प्रीतेश सूर्यवंशी, निलेश काटे, समर्थ दहीवाळ, स्वाती खरात, राहुल जाधव, योगेश टाकसाळ, कल्याण पवार, वेदीका मोताळे, सुदर्शन प्रधान, आकाश तनपुरे, रामेश्वर जाधव, श्वेता भेंडारकर, नागेश चामे, अंकिता कोठारे, भागवत झुंबड, वैष्णवी राऊत, निवेदीता केळापुरे, विक्रम चव्हाण, ऋषिकेश खंडाळे, सुहानी पवार.

**मार्गदर्शक** • प्राचार्य डॉ. रेखा शेळके, प्रा. आशा देशपांडे, प्रा. विशाखा गारखेडकर, प्रा. कविता सोनी, प्रा. दिव्या कांबळे, प्रा. विवेक राठोड, प्रा. तनवीर हुंडेकरी

या अनियतकालिकाचे सर्व मालकी हक्क डॉ. रेखा शेळके यांचे असून त्यांनी कदम प्रिंटोक्रॅट प्रा. लि. औरंगाबाद येथे छापून एमजीएम सीजेएमसी, एन-6, सिडको, औरंगाबाद येथे प्रकाशित केला. फक्त खाजगी वितरणासाठी.